# बालकेंद्री शिक्षणात शिक्षिकेची भूमिका

बालकेंद्री शिक्षणात शिक्षिकेची भूमिका कृतिशील मार्गदर्शकाची असावी लागेल. तिला, एकीकडे, 'मूल', 'विद्यार्थी' या विषयाचे चांगले आकलन उपलब्ध शास्त्रांच्या आधारे करवून घ्यावे लागेल; व वर्गातील प्रत्यक्ष कामाच्या नि अवलोकनाच्या आधारे, या आकलनाला पक्केपणा आणावा लागेल. तर दुसरीकडे सांघिक आणि वैयक्तिक पातळीवरून मुलांसाठी त्यांच्या शिक्षणाची उद्दिष्टे नक्की करावी लागतील आणि या उद्दिष्टांच्या दिशेने मार्गक्रमण करण्याची दिशा व वाट निश्चित करावी लागेल. इथे शिक्षिकेचे खरे काम सुरू होते. ही तिची आपल्या कामाची पूर्वतयारी असेल.

कृतिशील मार्गदर्शकाची आपली भूमिका वठविताना, दुस-या स्तरावर, ठरविलेल्या उद्दिष्टांच्या दिशेने आपला प्रत्येक विद्यार्थी जात आहे की नाही याची सातत्याने दखल घेत जावे लागेल. विद्यार्थ्यांना या दिशेने जाण्याची संधी पुरवत असतानाच, या संधींचा लाभ मुले घेत आहेत ना याचे पर्यवेक्षण करीत जावे लागेल. जिथे जिथे, जेव्हा जेव्हा विद्यार्थ्याला आपल्या स्वयंशिक्षणाच्या प्रक्रियेत अडचणी येतील तिथे आणि तेव्हा शिक्षिकेची मार्गदर्शकाची भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. आवश्यक तेथे विद्यार्थ्याला छोटी छोटी आणि वाढत्या प्रमाणातील कठीण अशी आव्हाने घेण्यासाठी प्रोत्साहित करणे, आपल्याला एखादी गोष्ट न जमल्याच्या निराशेचा अनुभव, विद्यार्थ्याला घेऊ देतानाच - आवश्यक तेथे मानसिक आधार पुरविणे, विद्यार्थ्यांच्या सबलता, विद्यार्थ्याच्या विशिष्ट बुध्दिमत्ता ओळखून त्यांना अधिक पुष्ट बनवत असतानाच, त्यांच्या दुर्बलतांची दखल घेऊन त्या आनंदाने स्वीकारण्याची तयारी करून देणे, एवढेच नव्हे तर या निर्बलतांचेही सबलतेत परिवर्तन करण्यासाठी आवश्यक उपायांचा अवलंब करणे; आणि या सा-या प्रकियांतून जाताना मुलांना आपल्या स्वावलंबी प्रयत्नांपासून ढळू न देणे, या सा-या जबाबदा-या शिक्षिकेला आनंदाने पेलावयाच्या असतात. शिक्षिकेची कृतिशीलता इथे पणाला लागत असते.

विद्यार्थ्याभोवती निर्माण केलेल्या विशिष्ट अशा शैक्षणिक वातावरणातून मुले आपल्या स्वतःच्या स्वावलंबी शिक्षणासाठी ऊर्जा घेत असतील तर हे वातावरण सतत सजग कसे राहील हे कृतिशील मार्गदर्शकाला पाहावे लागेल. ज्या वातावरणातून विद्यार्थ्यांची अंतस्थ सर्जनशीलता फुलत असते त्या वातावरणाचे योग्य असे संघटन करीत राहणे, ते वातावरण टिकवणे व जोपासणे हे शिक्षिकेचे, सातत्याने लक्ष पुरवीत राहावे अशा त-हेचे महत्त्वाचे काम असते.

उद्याच्या शिक्षणासाठी 'नवी' शिक्षणसंस्था असावी लागेल. ही अर्थातच मागील काळातील शिक्षणसंस्थेसारखी असून चालणार नाही. तिचा पाया वेगळा असेल, इमारत वेगळी असेल. तिला छप्पर

असेल, पण आपल्याला हवे तेव्हा ऊन-पावसाला आमंत्रण देता येईल आणि आकाशातील चंद्र-तारे न्याहाळता येतील अशी तिची लवचीक रचना असेल. या इमारतीला खिडक्या असतील, नि त्या सदैव उघडया असतील, दहा दिशांचे ज्ञानवारे आत घेण्याची आकांक्षा त्यांना असेल. दरवाजे केव्हाही, कुणालाही आतबाहेर करता येईल असे मोकळे असतील. शिक्षण बंदिस्त करता येणार नाही. याची जाणीव देण्याचे काम ते सतत करीत राहतील.

अशा शिक्षणसंस्थेत शिक्षकाची भूमिका पूर्वीपेक्षा अर्थातच, वेगळी असेल आणि ती अधिक महत्त्वाची असेल. आत्तासारखा जो 'शिकवतो' तो शिक्षक येथे नसेल तर 'शोध घेतो' तो शिक्षक येथे असेल. ज्याला मुलांच्या मनांचा ठाव शास्त्रीय अंगाने घेता येतो, ज्याला मुलांच्या बौध्दिक आणि भावनिक स्वरूपाच्या वैयक्तिक गरजांचे नेमके भान असते, नि त्या गरजांनुसार व्यक्तिविशिष्ट अशी शिक्षणरचना करता येते; ज्याला भोवतालच्या अस्तित्वात असलेल्या जगाचे शैक्षणिक स्वरूपात रूपांतर करता येते, आणि ज्याच्यात जीवनाचे रूपांतर शिक्षणात आणि शिक्षणाचे रूपांतर जीवनात करता येते असा शिक्षक हा आजच्या विद्यार्थ्यांचे उद्याचे जीवन घडविणारा म्हणून मान्यता पावेल यात शंका नाही. साहजिकच शिक्षकात स्वपरिवर्तनाची आणि त्यासाठी लागणा-या आत्मपरीक्षणाची ताकद असावी लागेल. घडोघडी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची घातक सवय त्याला मोडून काढावी लागेल आणि विद्यार्थ्यांना प्रश्न उपस्थित करण्यास उद्युक्त करण्याची कौशल्ये अंगी बाणवावी लागतील. आणि मुख्य म्हणजे, आजवर शाळांमधून चाललेला, मुलांना हुषार करण्याचा खटाटोप सोडून देऊन त्यांना चलाख बनविणा-या संधी उपलब्ध होतील हे शिक्षकाला पाहावे लागेल. येथे ‘हुषार' आणि 'चलाख' यांमधील फरक लक्षात घ्यायला हवा. थोडक्यात सांगायचे म्हणजे, जो दुस-यांनी पढविलेले उत्तम त-हेने करू शकतो. तो हुषार आणि जो स्वत:च्या विचारांनी, कल्पनांनी उत्तम निर्मितीप्रत जातो तो 'चलाख' होय. ज्या विद्यार्थ्यांचे शालेय वयांतच 'स्व'त्व जागे होते, बौध्दिक-भावनिक अंगांनी विकसित होते आणि क्षमतावृध्दी नि कौशल्यवृध्दींतून ते परिपूर्णतेकडे जावू लागते ते विद्यार्थी चलाख होतात. चलाख विद्यार्थी हे शोध घेण्यात तरबेज असतात, इतकेच नव्हे तर, आपल्या उपजत क्षमतांचा, बदलत्या वातावरणाला साजेशा अशा रूपांत वापर करण्याची कुशलता त्यांनी आत्मसात केलेली असते. उद्याचा शिक्षकही अशा चलाख विद्यार्थ्यांमधून यावा लागेल हे उघडच आहे.

आजचा शिक्षक नेहमीच विचार करतो तो आपल्या हातातील विषय, त्याचा एखादा घटक मुलांना कसा शिकवावा याचा. तो विषय, तो घटक, त्यातील गुंतागुंत, त्यातील विश्लेषण, तार्किकता इ. एक ना अनेक बाबींचा विचार तो करतो. कारण, त्याच्या दृष्टीने विषयाची मांडणी उत्तम त-हेने करता येणे महत्त्वाचे असते. ती मांडणी वर्गामध्ये, ठरविल्याप्रमाणे नीट झाली की त्याला समाधान होते. चांगला शिक्षक होणे, शिक्षकाने चांगले शिकविणे यात ही प्रक्रिया अनुस्यूत असते.

या प्रकियेत काही उणीव आहे का? एक उणीव आहे. ती म्हणजे यात, 'विद्यार्थ्यांच्या अंगाने मी कसे शिकविले पाहिजे', हे पाहण्याचा भाग राहून गेला आहे. म्हणजे वरच्या सगळया समाधानकारक प्रक्रियेची दिशाच राहून गेलेली आहे. विद्यार्थ्यांना कसे शिकविले म्हणजे चांगले समजते, विद्यार्थ्यांच्या कायमचे लक्षात राहते, शिकलेले आवश्यक तेव्हा वापरता येते, याचा शोध घेणे आणि मग त्यानुसार, त्याअंगाने आपल्या विषयाकडे पाहणे आणि आपल्या शिकविण्याकडे पाहणे हे यात राहून गेले आहे. कदाचित असेही घडेल की, या वेगळया अंगाने पाहू गेले तरी अखेरीस आपण आपल्या मूळच्याच पध्दतीकडे पोचू. मात्र दाट शक्यता अशीही आहे की आपण काही वेगळयाच पध्दतीकडे वळू. या मार्गाने आपण अगदी आपल्या पहिल्याच पध्दतीकडे आपण गेलो तरीही त्यात एक फरक असेल; आणि तो महत्त्वाचा आहे. तो म्हणजे, तो मार्ग आता अधिक योग्य अशा ज्ञानावर आधारलेला असेल. आपण जे करतो आहोत त्याला पक्के शास्त्रीय समर्थन असेल.

उद्याच्या 'नव्या' शिक्षणसंस्था निर्माण व्हायच्या असतील तर नव्या धर्तीच्या शिक्षणशास्त्र संस्था असाव्या लागतील. शिक्षक प्रशिक्षण पदविका आणि पदवी देणा-या अभ्यासकमांमध्ये आमूलाग्र बदल व्हावे लागतील. 'शिकविण्याचे शिक्षण देणा-या, आजच्या अशा संस्थांचे रूपांतर (विद्यार्थ्यांच्या) 'शिकण्याचे रक्षण करणा-या संस्थांमध्ये व्हावे लागेल. जिथे सा-या शिक्षणाचेच नवे परिवर्तीत रूप अस्तित्वात येते तेथे प्रशिक्षणालाही अंतर्बाहय बदलावे लागते. अनुभवाधारित शिक्षणाची मुहूर्तमेढ प्रशिक्षणसंस्थांमधून रूजवावी लागेल. प्रशिक्षण शिक्षणाचा पायाच बदलण्याची वेळ आता आली आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील वर्तनवादी मानसशास्त्राचा पाया बहुतांशी हलवावा लागेल. त्यांच्या जागी रचनावादी आकलनविषयक शास्त्राचा (कॉग्निटिव्ह सायन्स) पाया शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांना द्यावा लागेल. हे काम जिकीरीचे आहे, पण तेवढेच ते त्वरेचे आहे; कारण, कालच्या प्रशिक्षणाने उद्याचा शिक्षक घडणार नाही; आणि उद्याच्या शिक्षणासाठी कालचा शिक्षक चालणार नाही!

शिकणा-या विद्यार्थ्यापुढे सतत नवनवी आव्हाने ठेवावी लागतात; तेव्हाच शिक्षणाची प्रकिया आनंदमय आणि उपयुक्त ठरते. जेव्हा आव्हानांचे क्षितिज सतत विस्तारत जाते तेव्हा मुले आपणहून शोध घेण्याचे काम करीत राहतात. या शोध घेण्यातूनच शिक्षण होत असते. अशी शोध घेण्याची प्रवृत्ती हीच ज्ञाननिर्मितीची जननी असते. आज आपण जेव्हा ज्ञानयुगाच्या उंबरठयावर उभे आहोत, तेव्हा अशी ज्ञाननिर्मितीची उदंड क्षमता असलेला विद्यार्थी भावी कालासाठी तयार व्हावा लागेल. शिक्षक हा या सा-या प्रकियेत मागील काळापेक्षाही कितीतरी अधिक योगदान करून आपलेच जीवन कृतार्थ करू शकतो.

❖